**सुकळी तलाव प्रकल्प, ता. आर्वी, जि. वर्धा या योजनेस चतुर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत**

# विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ , नागपूर

महामंडळाचा निर्णय क्र. ०४ /विपाविम/कातां.२/सुकळी तलाव प्रकल्प /चतुर्थ सुप्रमा/(धा.क्र. २३/१६),
दिनांक : ०२/०१/२०१९

**पहावे :** महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/(३५/२०१५)/जसं(अ), मंत्रालय, मुंबई, दिनांक ९ सप्टेंबर २०१५

सुकळी तलाव प्रकल्प, ता. आर्वी, जि. वर्धा या योजनेस शासन निर्णय क्र.१०८८/१५८/८८/ लपा-२/१९९३, दिनांक२०.०१.१९९३ अन्वये अंदाजित खर्च रु.५०२.५८७ लक्ष (रुपये पाच कोटी दोन लक्ष अठ्ठावन्न हजार सातशे फक्त) इतक्या किंमतीस (दरसूची १९९०-९१ वर आधारित) मुळ प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती.

तद्नंतर शासन निर्णय क्रमांक लपात-२००३/सुकळी//लपा/३१२/२०००/लपा-२, मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक १३.१२.२००० अन्वये रु.१८६४.१६४ लक्ष (रुपये अठरा कोटी चौसष्ट लक्ष सोळा हजार चारशे फक्त) इतक्या किंमतीस (दरसूची १९९९-२००० वर आधारित) प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. तद्नंतर विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर महामंडळाचा निर्णय क्र.विपाविम/ कातां.२/३९१६/व्दितीय सुप्रमा/६४/२००५, दिनांक २८.१२.२००६ अन्वये रुपये ३८६६.२०९ (रुपये अडतीस कोटी सहासष्ट लक्ष विस हजार नऊशे फक्त) इतक्या किंमतीस (दरसूची २००५-०६ वर आधारित) द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली.

शासन निर्णय लपात-२३०९/(३७/०९)/लपा-२, मंत्रालय, मुंबई, दिनांक १.१२.२०११ अन्वये रुपये ६२७२.५१४ लक्ष (रुपये बासष्ट कोटी बहात्तर लक्ष ऐक्कावन हजार चारशे फक्त) इतक्या किंमतीस (दरसूची २००७-०८ वर आधारित) तृतीय प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. दरसूचीतील बदलामुळे झालेली वाढ जास्त दराच्या निविदा स्विकृतीमुळै वाढ, भुसंपादन खर्चातील वाढ, इतर कारणे व अनुषंगिक खर्चातील वाढ इत्यादी कारणामुळे वाढ झाली असून योजनेची अद्यावत किंमत तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता किंमतीच्या १०% हून अधिक वाढत असल्याने योजनेस पुन्हा सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणे आवश्यक झाले आहे.

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचा निर्णय :-**

विदर्भ पाटबंधो विकास महामंडळ आता या निर्णयान्वये सुकळी तलाव प्रकल्प, ता. आर्वी, जि. वर्धा या योजनेच्या एकूण अंदाजित किंमत रु.८१६७.६१ लक्ष (ऐक्यांशी कोटी सदुसष्ठ लक्ष ऐकसष्ट हजार रुपये फक्त) खर्चास चतुर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करीत आहे. त्यापैकी रु.३०.५५ लक्ष (तिस लक्ष पंचावन्न हजार रुपये फक्त) अनुषंगिक खर्च आहे. अंदाजपत्रकात उर्वरीत कामासाठी सन २०१६-१७ या वर्षाच्या दरसूची प्रमाणे दर वापरण्यात आले आहेत. उपशिर्षवार तरतूदीचा गोषवारा परिशिष्ट-१ मध्ये संलग्न आहे.

**ठळक बाबी :-**

| | | |
|---|---|---|
| अ) योजनेचे सिंचन क्षेत्र | ... | १७२० हेक्टर |
| ब) योजनेचे सिंचन क्षमता | ... | १७२०हेक्टर |
| क) योजनेचे लाभव्यय गुणोत्तर | ... | १.३० (मापदंड १.०० पेक्षा जास्त) |